# यावल महाविद्यालयात आरोग्य प्रशिक्षण वर्ग संपन्न

यावल (वार्ताहर) जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, यावल येथे तालुका आरोग्य विभागाच्या वतीने टी. बी. मुक्त भारत व मातृवंदना प्रशिक्षण वर्गाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.असे सामाजिक उपक्रम राबविण्याच्या दृष्टीने संस्था व महाविद्यालयाच्या वतीने बहुउद्देशीय हॉल विनामूल्य उपलब्ध करून दिला जातो. सदर प्रशिक्षण वर्गाच्या कार्यक्रमाला यावल तालुक्यातील 250 च्या जवळपास आशा आरोग्य सेविका हजर होत्या. सदर कार्यक्रमाला तालुका आरोग्य अधिकारी डॉ. श्री. हेमंत बऱ्हाटे हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्या डॉ. संध्या सोनवणे अध्यक्षस्थानी हजर होते. कार्यक्रमासाठी श्री. तडवी व त्यांचे सहकारी हजर होते. कार्यक्रमास महाविद्यालयातील उपप्राचार्य प्रा. एम.डी. खैरनार व उपप्राचार्य प्रा. ए. पी. पाटील हजर होते व कार्यक्रम यशस्वीतेसाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.






संवाद • क्षयरोगमुक्त भारत अभियान, मातृवंदना प्रशिक्षण वर्गात प्राचार्या डॉ.संध्या सोनवणे यांचे प्रतिपाद

# महिला त्यांची जबाबदारी सक्षमपणे पार पाडतात

प्रतिनिधी | यावल

कर्तव्य बजावताना महिलांची अधिक दमछाक होते. तरीही महिला कुटुंबासह आपल्यावरील सामाजिक जबाबदारी सक्षमपणे पार पाडतात. आता सन २०२५ पर्यंत क्षयरोगमुक्त भारत अभियानाची आशा सेविकांकडे जबाबदारी आहे. ती सक्षमपणे पार पाडली जाईल, असे प्राचार्य डॉ. संध्या सोनवणे यांनी सांगितले. क्षयरोगमुक्त भारत आणि मातृवंदना प्रशिक्षण वर्गात त्या बोलत होत्या.

यावल महाविद्यालयात तालुका आरोग्य विभागाने क्षयरोगमुक्त भारत व मातृवंदना प्रशिक्षण कार्यक्रम घेतला. त्यात तालुक्यातील सर्व ४० आशा सेविकांना आगामी काळात टीबीमुक्त भारत अभियानात कसे काम करायचे? याचे प्रशिक्षण देण्यात आले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.संध्या सोनवणे, तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून आरोग्य अधिकारी डॉ. हेमंत बऱ्हाटे होते. आशा सेविकांनी घरोघरी जाऊन क्षयरोग संदर्भातील माहिती संकलित करायची आहे, त्यातून संशयितांची तपासणी कशी होईल? याबाबत माहिती देण्यात आली. उपप्राचार्य प्रा.एम.डी.खैरनार, प्रा.ए.पी.पाटील, क्षयरोग विभागाचे नरेंद्र तायडे यांनी सहकार्य केले. या अभियानासाठी माहिती संकलित करणाऱ्या आशा सेविकांनी सहकार्य करावे, असे आवाहन डॉ.हेमंत बऱ्हाटे यांनी केले.

क्षयरोगमुक्त भारत अभियानाची माहिती देण्यासाठी आयोजित प्रशिक्षण वर्गात आशा सेविकांना मार्गदर्शन करताना यावल महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.संध्या सोनवणे. व्यासपीठावर डॉ.हेमंत बऱ्हाटे.

**२०२५ पर्यंत क्षयरोगमुक्ती :** देश पातळीवर क्षयरोग मुक्तीसाठी कुटुंबनिहाय आरोग्य पत्रक तयार होईल. त्यात क्षयरोगासंबंधी तक्रार व संशयित रुग्णांची आकडेवारी मिळवली जाईल. यानंतर त्यांच्यावर तातडीने उपचार केले जातील. या पद्धतीने सन २०२५ पर्यंत भारत क्षयरोगमुक्त करण्याचे नियोजन आहे.